Jan 2019

Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved Internationai Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.publishjournal.co.in

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue XIX (19) , Vol. I June 2019 | Peer Reviewed SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

# Index

**1.** Digital Banking :An Overview 5
Dr Madhukar P Aghav
**2.** Financial Markets : Evaluating Averages and Indicators 13
Dr Sachin Nagnath Hadoltikar
Memon Sohel Mohd Yusuf
**3.** Human Resource Management (Hrm) :An Overview 19
Dr. Kathar Ganesh. N.
**4.** Impact of Mergers & Acquisition on Private Sector Banks In Global Economy 26
Dr. Nanaji Krishna Aher
**5.** Dramatic Stress: The Spirit of Play 32
Sheema Farheen
Dr Farhat Durrani
**6.** Recent Trend InBanking 41
Swapnil .Kalyan. Laghane, Dr Quazi Baseer Ahmed
**7.** Corporate Governance in Maharashtra Companies 49
Dr. Rajesh Bhausaheb Lahane
**8.** Effective Digital Marketing Strategies & Approaches 59
Dr Vikrant Uttamrao Panchal
**9.** Global Competitiveness of Indian Industries Strategy and Innovation 70
Dr. Rajendra Ashokrao Udhan
**10.** Indian logistics Trade in Dynamic World Scenario 79
Adnan Ali Zaidi, Dr Memon Ubed
**11.** Isolation of Cyanobacterial strains utilizing crude oil from sea water 95
Dr.K.G.Maske
**12. The Role of Irrigation Technology in Agricultural Development in satara District : A Geographical Study** **98**
**Dr. B.R.Shinde**
**13.** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध धम्म् 103
डॉ. आर. एस. पारवे
**14. लातूर जिल्ह्यातील आत्मकथने** 108
**डॉ. दुष्यंत कटारे**
16 नई बिसात : उपन्यास में दलित चित्रांकण 111
डॉ. बालाजी कोनाळे
१७ अश्क के नाटकों में नारी चरित्रों के विभिन्न रूप 114
डॉ. प्रदीप सूर्यवंशी

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Issue XIX (19), Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June 2019 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध धम्म्

**डॉ. आर. एस. पारवे**
संशोधक मार्गदर्शक व विभाग प्रमुख, इतिहास विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर

---

महात्मा गौतम बुद्धानी मानवी जीवनातील सत्याचा शोध व बोध घेण्यासाठी आपल्या राजवैभवाचा व वैभव संपन्न ग्रहस्थी जीवनाचा त्याग केला व सन्याशी वृत्ती धारण करून ते चिंतन, मनन, तपश्चर्या करू लागले. सारनाथच्या मृगवनात, तपश्चर्या, चिंतन, मनन करत असताना त्यांच्या बरोबर असलेले त्यांचे पाच ब्राह्मण सहाध्यायी त्यांना सोडून गेले होते. पुढे गौतम बुद्धाला सत्याचा बोध झाल्यानंतर गौतम बुद्धांनी आपल्याला प्राप्त झालेले ज्ञान म्हणजेच पहिले प्रवचन सारनाथ या ठिकाणी त्यांना मृगवनातून सोडून गेलेल्या पाच ब्राह्मण सहअध्यायाना सांगितले त्या सहअध्यायानी या बुद्धांचा विचार मान्य केला व ते गौतम बुद्धांचे अनुयायी झाले. या घटनेला धर्मचक्र प्रवर्तन अस म्हटले जाते.[१] त्यानंतर लाखो अनुयायी गौतम बुद्धाला मिळाले होते. या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायासह बोद्ध धम्माची दिक्षा घेतली. ही घटना देखील आधुनिक जगाच्या इतिहासातील फार मोठी ऐतिहासीक घटना आहे. कारण यामुळे पुन्हा एकदा भारतात बौद्ध धम्म चळवळ सक्रीय झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फार मोठ्या उदात्त ध्येयवादाने प्रेरीत होवून बौद्ध धम्माचा स्विकार केला. समता, स्वातंत्र्य, बंधूत्व यासारख्या शाश्वत मूल्यांचे या धर्मांतराला तात्विक अधिष्ठान होते. त्याच बरोबर करूणा, प्रज्ञा, यासारखी बौद्ध धर्मातील मूलभुत तत्वेही डॉ. आंबेडकरांना महत्वाची वाटत होती.[२] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनामध्ये धर्मांतराच्या घटनेस अनन्यसाधारण असे महत्त्व होते. किंबहूना संपूर्ण दलित समाजातील लोकांच्या दृष्टीने ही एक अभूतपूर्व अशी घटना होती व बोद्ध धर्माच्या पुनरूजीवनाच्या दृष्टीनेही ही ऐतिहासिक घटना होती.

**माणूसकीसाठी धर्मांतराची घोषणा:**

हिंदूधर्मात राहून दलितांना सामाजिक व राजकीय न्याय मिळू शकणार नाही याची डॉ. आंबेडकरांना खात्री पटत चालली होती. त्यामुळेच १४ ऑक्टोबर १९३५ रोजी येवले येथे डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची जाहीर घोषणा केली. येवल्याच्या भाषणात ते म्हणाले की, "मी हिंदू म्हणून जन्मलो परंतु हिंदू म्हणून मरणार नाही." येवल्याच्या भाषणात त्यांनी हिंदूधर्मातील विषमतेवर हल्ला चढवला होता. येवल्याच्या परिषदेत जे तीन ठराव झाले ते असे होते-

१) समता व स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी धर्मपरिवर्तन आवश्यक आहे.

२) ही परीषद डॉ. आंबेडकरांना विश्वास देत आहे की महारजाती सामुदायिकरित्या धर्मांतरास सिद्ध आहे.

३) धर्मांतराच्या दिशेने पाऊल म्हणून (अ) हिंदु देव-देवतांची पूजा करणे सोडून देऊ (ब) हिंदूचे सण साजर करणार नाही (क) हिंदू धर्म मंदिरात प्रवेश करणार नाही.[३] येवल्याच्या घोषणेवर सवर्ण हिंदूसमाजाने विविध प्रतिक्रिया दिल्या. तेव्हा ३१ मे १९३६ रोजी अखिल मुंबई इलाखा महार परिषदेत, "धर्मांतर का? या प्रश्नांची मीमांसा करताना डॉ. आंबेडकर अध्यक्षीय भाषणात असे म्हणाले की, अस्पृश्यतेचा प्रश्न हा वर्गकलहाचा प्रश्न आहे. स्पृश्य व अस्पृश्य या दोन समाजातील कलहांचा प्रश्न आहे. एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर केलेल्या अन्याया अत्याचारांचा प्रश्न आहे. जोवर हिंदू धर्म आहे तोवर अस्पृश्यता आहे. या कलहातून सुटका करुन घेण्यासाठी तुमच्याजवळ पुरेसे सामर्थ्य आहे काय? त्यासाठी तीन बले आवश्यक आहेत. एक मनुष्यबल, दुसरे द्रव्यबल, तिसरे मानसिक बल हे तीनही बल नसलेल्या दलित जातीजमातींना सामर्थ्य संपादनाशिवाय तरणोपाय नाही." आणि हे सामर्थ्य धर्मांतराने मिळेल असा बाबासाहेबांना विश्वास होता. ते म्हणाले, "ज्या धर्मात एकाने विद्या शिकावी, दुसऱ्या वर्गाने शस्त्र धरावे, तिसऱ्याने व्यापार करावा व चौथ्याने नुसती सेवा करावी असे आहे तो धर्म मला मान्य नाही. व्यक्तिच्या विकासाला तीन गोष्टींची आवश्यकता आहे. सहानुभूती, समता आणि स्वातंत्र्य. हिंदूधर्मात या तिन्हीपैकी एकहीबाब नाही." माणूस धर्माकरता नाही तर धर्म माणसाकरता आहे व माणूसकी प्राप्त करुन घ्यायची असेल तर धर्मांतर करा.[४] या पद्धतीने येवल्याच्या परिषदेमध्ये डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली होती.

Issue XIX (19), Vol. I | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
June 2019 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

बुद्धांनी जी मानवतेची शिकवण दिली होती त्यावर आधारित उदयास आलेल्या बौद्ध धम्माचा प्रसार सम्राट अशोकाच्या कारकीर्दीत भारतात व भारताच्या बाहेर झाला. अनेक राजांनी राजाश्रय दिल्याने प्राचीन काळात बौद्ध धम्म हाच राष्ट्रीय धर्म झाला होता. परंतु इ. स. १००० नंतर उदयास आलेल्या वैदिक राजकर्त्यांनी वैदिक धर्माचा प्रोत्साहन दिल्याने बौद्ध धम्माची भारतातून पिछेहाट झाली होती. डॉ. आंबेडकरांच्या कार्यामुळे पुन्हा बौद्ध धम्माची चळवळ गतीमान झाली आहे. ज्या दिक्षा भूमीवर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बाबासाहेब आंबेडकरांनी धम्म दिक्षा घेतली आणि आपल्या लाखो अनुयायांना बुद्धाच्या मार्गावर चालण्याचे आवाहन केले. ती दीक्षाभूमी भौद्धांचे पवित्र तीर्थक्षेत्र बनले आहे. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यामुळे भारताची अखंडता व भारतीय संस्कृती टिकून राहिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला बुद्ध धम्म हा लोककल्याणाचा जीवनमार्ग आहे. अर्थात हा मार्ग सदाचार, बंधूभाव, समता, स्वातंत्र्य आणि न्यायाचा आहे. बुद्धाच्या धम्मात कोणत्याही पातळीवरचे शोषण मान्य नाही. तसेच उच्चनीचताही मान्य नाही. धम्मातील सदाचरण मोक्षप्राप्तीसाठी नाही तर वर्तमानातील इतरांचे आणि आपले जीवन सुखकर व्हावे यासाठी आहे. सदाचारासाठी शील सर्वात महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर प्रज्ञा, करुणा, आणि बाबासाहेबांनी सांगितलेल्या २२ प्रतिज्ञाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. बाबासाहेबांनी सांगितलेला बुद्ध धम्म हा समाजात आणि देशात ऐक्य, बंधुभाव, समता, न्याय प्रस्थापित करण्यासाठी अत्यंत उपयोगी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला बुद्ध धम्म हा माणसाच्या त्याचप्रमाणे जगाच्या प्रगतीच्या सामाजिक नीतीचा मंगल व सार्वभौम मूल्ये जपणारा आणि मानणारा जीवनमार्ग आहे.

**संदर्भ सूची:**

०१. जोशी पी. जे. - भारताचा इतिहास (२००२), पृ. क्र. १२१
०२. डॉ. मा. प. मंगुडकर - "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मदीक्षा", लोकराज्य, धम्मचक्र प्रवर्तन महोत्सव विशेषांक, ऑक्टोबर २००६, पृ. क्र. २२
०३. भालचंद्र फडके - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृ. क्र. १८४
०४. भालचंद्र फडके - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृ. क्र. १८७
०५. शंकरराव खरात - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, पृ. क्र. २
०६. डॉ. मा. प. मंगुडकर - "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मदीक्षा", लोकराज्य, धम्मचक्र प्रवर्तन महोत्सव विशेषांक, ऑक्टोबर २००६, पृ. क्र. २८
०७. वामन निबांळकर - "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बुद्धधम्म", लोकराज्य, ऑक्टोबर २००६, पृ. क्र. १०७
०८. शंकरराव खरात - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, पृ. क्र. १५९
०९. शंकरराव खरात - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, पृ. क्र. १६०
१०. कित्ता - पृ. क्र. १६२
११. डी. सी. अहेर - "डॉ. आंबेडकर आणि भारतातील बुद्धधम्माची चळवळ", लोकराज्य ऑक्टोबर २००६, पृ. क्र. ३२
१२. शंकरराव हातोले - धम्मदीक्षा समारंभ, पृ. क्र. ३७
१३. शंकरराव खरात - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, पृ. क्र. २०३
१४. शंकरराव खरात - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, पृ. क्र. २०५

Current Global Reviewer


ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

Peer Reviwed Journal

ISSN 2319-8648



Edited By
Shaurya Publication
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

Publisher
Shaurya Publication

www.publishjournal.co.in